# मुंबई विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग
क्र. वि.क.वि./ ४३ /२०१९

डॉ. सुनिल पाटील
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन,
'ब' पथ, चर्चगेट,
मुंबई – ४०० ०२०


**परिपत्रक:**

**विषयः दि. २७ फेब्रुवारी २०१९ हा मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्याबाबत...**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासन व मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांनी दिलेल्या निर्देशानूसार आपणांस कळवू इच्छितो की, दि. २७ फेब्रुवारी २०१९ हा 'मराठी भाषा गौरव दिन' विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालये/परिसंस्था/विद्यापीठ विभागामध्ये साजरा करण्यात यावा.

जेष्ठ कवी व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेच्या साहित्य क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणून व मातृभाषेचा गौरव म्हणून श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिन, 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून, शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशनानूसार यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी आपण **'मराठी म्हणी'** या विषयाला प्राधान्य देण्याचे ठरविले आहे.

'मराठी म्हणी' या मध्यवर्ती कल्पनेच्या अनुषंगाने मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनाचा विचार होणे अपेक्षित आहे.

चला, मराठी म्हण जपू या! मराठीचे धन जपू या!!
चला, मराठी म्हण जपू या! मराठीचे धन जपू या!!..... असा संकल्प करून,

आपण प्रामुख्याने मराठीतील म्हणीविषयक कार्यक्रम उपक्रम आयोजित करावे.

त्याचप्रमाणे हे वर्ष ग.दि. माडगुळकर व पु.ल. देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे, त्यामुळे उपक्रमांमध्ये या प्रतिभावंतांच्या साहित्याचाही यशायोग्य विचार व्हावा.

मरठी भाषा गौरव दिनी मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य शिक्षक आणि विद्यार्थी या सर्वांनी सदर दिनी आपला सहभाग नोंदवावा.

तसेच सोबत जोडलेल्या बोधचिन्ह (लोगो) यांच्या रंगीत प्रती काढाव्यात व दर्शनी भागात कार्यक्रम स्थळी प्रदर्शीत कराव्यात. (जोडपत्र क्र.१)

तसेच दि. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त करावयाच्या उपक्रमाची सुची आपल्या माहितीसाठी सोबत जोडीत आहे. (जोडपत्र क्र.२)

तरी आपणांस कळविण्यात येते की, मराठी संवर्धनाबाबत व श्री. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिन, 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यासाठी आपल्याकडून गांर्भीयाने व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी व तसा अहवाल सदर कार्यालयास Email: deptstudentswelfare@gmail.com द्वारे सादर करावा ही विनंती.

**[डॉ. सुनिल पाटील]**
**प्र. संचालक, वि. वि. वि**

**मुंबई: ४०० ०२०**
**दिनांक: १४ फेब्रुवारी, २०१९**

प्रत: विद्यापीठ विभागाचे प्रमुख व संलग्नित महाविद्यालयाचे व संस्थेचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता यांना त्यांच्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना